# प्रेसनोट

दि.१०/०६/२०२२

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | कर्जत पो.स्टे., जि.अहमदनगर गु.र.नं.३९८/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम १३(१)(सी)(डी), १३(२) सह<br>भा.दं.वि.क.४६८, ४७१, १२०(ब), ३४ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १)रमेश गोविंद गोलेकर, वय–६३ वर्ष, सेवानिवृत्त (तत्कालीन पद सहायक वन संरक्षक रोहयो व अतिक्रमण निर्मुलन श्रीगोंदा, रा.खर्डा, ता.जामखेड, जि.अहमदनगर<br>२)शंकरराव वृषीकेत पाटील, वय–४४ वर्ष, वन परिक्षेत्र अधिकारी, सध्या नेमणुक टिंबर डेपो, बल्लारशहा, जि.चंद्रपूर<br>३)व्हि.वाय.शिंदे, तत्कालीन वनपाल (मयत)<br>४)शेखर रमेश पाटोळे, वय–४१ वर्ष, वनरक्षक, नेमणुक राजुर, ता.अकोले. |
| शासकीय योजनेत अपहार केलेली रक्कम | रुपये ९,३२०/– |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, महाराष्ट्र शासनाकडून सन २०१५–१६ मध्ये जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत उप वनसंरक्षक (प्रा.) वन विभाग, अहमदनगर यांचे अधिपत्याखालील मौजे कोंभळी येथील गट नं.१८१, ता.कर्जत, जि.अहमदनगर येथील खोल सलग समतल चर या झालेल्या कामाची उघड चौकशी करणेबाबत आदेश झाले होते. त्याप्रमाणे मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा., मुंबई व मा. पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांचे आदेशानुसार उपरोक्त कामाची उघड चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर घटकामार्फत दि.४/९/२०२१ पासुन सुरु करण्यात आली.<br>सदर कामाच्या सखोल चौकशी अंती आरोपी नं.१)रमेश गोविंद गोलेकर, सेवानिवृत्त (तत्कालीन पद सहायक वन संरक्षक रोहियो व अतिक्रमण निर्मुलन श्रीगोंदा २)शंकरराव वृषीकेत पाटील, वन परिक्षेत्र अधिकारी, सध्या नेमणुक टिंबर डेपो, बल्लारशहा, जि.चंद्रपूर ३)व्हि.वाय.शिंदे, तत्कालीन वनपाल (मयत) ४)शेखर रमेश पाटोळे, वय–४१ वर्ष, वनरक्षक, सध्या नेमणुक राजुर, ता.अकोले यांनी मौजे कोंभळी येथील गट नं.१८१, ता. कर्जत, जि.अहमदनगर येथील खोल सलग समतल चर या झालेल्या कामामध्ये संगनमत करुन फौजदारीपात्र कट रचून स्वत:च्या फायदयासाठी शासकीय योजनेच्या कामात खोटे दस्तऐवज तयार करुन अनियमितता व भ्रष्टाचार करुन रुपये ९३२०/– इतक्या रकमेचा भ्रष्टाचार करुन प्रथमदर्शनी शासनाचे रुपये ९३२०/– इतक्या रकमेचे नुकसान केल्याचे निष्पन्न झाले असले बाबतचा अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात आला. सदर अहवालावरुन वरिष्ठांचे आदेशावरुन यातील आरोपी नं.३ व्हि.वाय. शिंदे हे मयत झाले असल्याने ते वगळुन आरोपी नं.१)रमेश गोविंद गोलेकर २)शंकरराव वृषीकेत पाटील ४)शेखर रमेश पाटोळे यांचेविरुध्द कर्जत पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर गु.र.नं.३९८/२०२२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम १३(१)(सी)(डी), १३(२), भा.दं.वि.क.४६८, ४७१, १२०(ब), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील पोलीस उप अधीक्षक हरिष खेडकर, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर हे करीत आहेत. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल ऑनलाईन तक्रार :– acbwebmail@mahapolice.gov.in

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

10.06

(हरिष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर